RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ११, अंक ८(५)] सोमवार, एप्रिल २८, २०२५/वैशाख ८, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**—महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. | **पृष्ठे** १–२ |

दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९९६ चा महा. १५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम २ मध्ये, खंड (क) मधील, "(कोयना जल विद्युत वीज प्रकल्प वगळून)" हा मजकूर वगळण्यात येईल. १९९६ चा महा. १५.

घोषणा.

**३.** याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, २०२५ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, कोयना जल विद्युत वीज प्रकल्प, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे सोपविण्यात, सुपूर्द करण्यात व हस्तांतरित करण्यात येत आहे ; आणि उक्त प्रकल्पाच्या बाबतीत उपरोक्त प्रारंभाचा दिनांक हा, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी, नेमून दिलेला दिनांक असेल. (२०२५ चा महा. २७.) (१९९६ चा महा. १५.)

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.